अस्सल सोलापुरी
सुराज्य सोलापूर

# मोटारीच्या धडकेने रिक्षातील महिला जखमी

✔ सोलापूर/प्रतिनिधी




रिक्षातून प्रवास करीत असताना समोरून मोटार धडकल्याने ३८ वर्षीय महिला प्रवासी जखमी झाली. हा अपघात डफरीन चौकाजवळ मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडला.

महानंदा सिद्ध।राम उमराणी (वय ३८ रा.इंदिरानगर, सत्तरफूट रोड) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्या मंगळवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घरापासून रेल्वे स्टेशनकडे रिक्षातून निघाल्या होत्या. डफरीन चौकाजवळ एम्प्लॉयमेंट चौकच्या दिशेने येणारी मोटार धडकल्याने त्या जखमी झाल्या. या अपघाताची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.



# पडघम वाजले

# सोलापूरसह राज्यातील लोकल बॉडीची निवडणूक जाहीर

## आचारसहिंता लागू

## २ डिसेंबरला मतदान; ३ डिसेंबरला होणार फैसला

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील १० नगरपालिका,२ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायती अशा १६ स्थानिक स्वराज्य संस्थांसह राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका मंगळवारी जाहीर झाल्या आहेत.त्यामुळे पुढील महिन्यापर्यंत राज्यात राजकीय रणकंदन माजणार आहे.या निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून गुडघ्याला बाशिंग बांधून मैदानात उतरणाऱ्या उमेदवारांचा राजकीय भवितव्याचा फैसला म्हणजेच निकाल ३ डिसेंबर रोजी लागेल. मंगळवारपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.



अधिक बातम्या पान १२ वर...

राज्यातील २९ महापालिका, ३२ जिल्हा परिषदा, ४२ नगर पंचायती, ३३६ पंचायत समिती, २४६ नगरपालिकांची मुदत संपली असून त्यासाठी निवडणुका घेतल्या जाणार आहेत. त्याच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका होतील.

### निवडणुकीचे टाईमटेबल

| | |
|---|---|
| उमेदवारी दाखल करण्याचा आरंभ | १० नोव्हेंबर |
| अंतिम मुदत | १७ नोव्हेंबर |
| छाननी | १८ नोव्हेंबर |
| अर्ज माघारी घेण्याची तारीख | २१ नोव्हेंबर |
| निवडणूक चिन्ह वाटप | २६ नोव्हेबर |
| मतदान | २ डिसेंबर |
| निकाल | ३ डिसेंबर |

### नवीन ॲपची निर्मिती

मतदारांच्या सोयीसाठी नवीन ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. दुबार मतदानासंदर्भात योग्य खबरदारी घेतली आहे. संभाव्य दुबार मतदारांच्या पुढे डबल स्टारचे चिन्ह दाखवण्यात आले आहे. ज्या मतदारांच्या पुढे डबल स्टार असेल त्याच्याकडून दुसरीकडे मतदान करणार नाही, असे डिक्लरेशन घेतले जाईल.

### एकूण मतदार?

| | |
|---|---|
| एकूण मतदार | १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ |
| महिला मतदार | ५३ लाख २२ हजार ८७० |

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मतदान होणार आहे. त्यामध्ये एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार असतील. त्यामध्ये ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदार असतील. या निवडणुकांसाठी राज्यात एकूण १३ हजार कन्ट्रोल युनिट स्थापन करण्यात आले आहेत.

### गुलाबी मतदान केंद्र

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ३२ कॅम्पेन बनवण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. दिव्यांग मतदार, तान्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. तसेच काही मतदार केंद्र गुलाबी केंद्र असणार असून त्यात सर्व अधिकारी या महिला असतील.

### सोलापूर जिल्ह्यातील चित्र


अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, पंढरपूर, बार्शी, करमाळा, कुर्डुवाडी, मंगळवेढा, सांगोला, माळशिरस या १० नगरपालिका,मोहोळ,सांगोला या दोन नगरपरिषदा आणि अनगर, नातेपुते, वैराग आणि अकलूज या चार नगरपंचायती अशा एकूण १६ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत.माढा नगरपालिका आणि श्रीपूर-महाळुंग नगरपंचायतीची निवडणूक यापूर्वीच झालेली आहे.

### उमेदवारांच्या खर्चात वाढ

यंदा नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. त्यानुसार अ वर्ग नगरपालिकांच्या अध्यक्षपदासाठी १५ लाखांची मर्यादा तर क वर्ग नगरपालिकांसाठी ७ लाखांची खर्च मर्यादा ठरवण्यात आली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तयारी पण सुरू केली?

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 477-89-126 |
| संगम श्री नाईट | 239-40-280 |
| कल्याण | 578-02-138 |
| मुंबई | 125-86-240 |





